# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
# Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik

**(महाराष्ट्र शासनाने वर्षे १९८९ मध्ये स्थापिलेले)**

(Established by Government of Maharashtra in the year 1989)

## व्यवस्थापन मंडळबैठक
## Board of Management Meeting

## कार्यवृत्त
**Minutes of Meeting**

**बैठक क्रमांक** : 194
(Meeting Number)

**स्थळ(Venue)** : विद्यापीठ मुख्यालय सभागृह,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
नाशिक ४२२२२२
Administrative Building Meeting Hall
Yashwantrao Chavan Maharashtra Open, University,
Nashik, 422222

**वार व दिनांक** : गुरुवार, दिनांक 18जुलै 2024
**(Day and Date)** : Thruesday,18th July 2024

**वेळ** (Time) : सकाळी11.30 वाजता (11.30am)

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

## 194वी व्यवस्थापन मंडळ बैठक

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाची 194 वी बैठक (ऑनलाईन व ऑफलाईन) पद्धतीने गुरुवार, दि. 18 जुलै 2024 रोजी सकाळी 11.30 वा. आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस पुढील सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| 01 | मा. प्रा. संजीव सोनवणे, कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | अध्यक्ष |
| 02 | डॉ.जोगेंद्रसिंह बिसेन, प्र-कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | सदस्य |
| 03 | मा. संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई यांचे प्रतिनिधी श्री. गर्जे, नाशिक | | सदस्य |
| 04 | डॉ. संजय घनश्याम भावे, कुलगुरू कोकण कृषी विद्यापीठ, दापोली | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 05 | प्रा. वाल्मिक कचरू सरवदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजी नगर | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 06 | श्री. नरेंद्र अनंतराव जोशी, अंबेजोगाई | | सदस्य |
| 07 | डॉ. अनिल प्रभाकर कुलकर्णी, पुणे | | सदस्य |
| 08 | श्री. भटुप्रसाद पाटील, परीक्षा नियंत्रक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | निमंत्रित सदस्य |
| 09 | डॉ. गोविंद कतलाकुटे, वित्त अधिकारी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | निमंत्रित सदस्य |
| 10 | श्री. दिलीप भरड, कुलसचिव | | सदस्य सचिव |

पुढील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| 01 | सचिव, उच्च शिक्षण, मुंबई | सदस्य |
| 02 | सचिव, उद्योग, मुंबई | सदस्य |
| 03 | सचिव, कृषी, मुंबई | सदस्य |
| 04 | मा. संचालक, उच्च शिक्षण, मुंबई | सदस्य |
| 05 | मा. संचालक, व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण, मुंबई | सदस्य |
| 06 | श्री. उदित शेठ, संशोधन, मुंबई | सदस्य |
| 07 | डॉ. संजय चोरडिया, उद्योग, मुंबई | सदस्य |
| 08 | प्रो. सत्ताकाम, नवी दिल्ली | सदस्य |

| अनु.क्रमांक<br>**Subject No.** | | तपशील<br>**Details** |
|---|---|---|
| | | बैठकीला सुरुवात करण्यापूर्वी व्यवस्थापन मंडळाचे मा. कुलगुरुंनी त्यांच्या अधिकारात नियुक्त केलेले निरंतर शिक्षण विद्याशाखेचे संचालक डॉ. जयदीप निकम यांचे मा. कुलगुरूंनी विद्यापीठाची शाल देऊन तसेच मा. व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ. अनिल कुलकर्णी यांचे हस्ते विद्यापीठाचे बोधचिन्ह असलेले चांदीचे नाणे देऊन सत्कार करण्यात आला. त्यावेळी डॉ. जयदीप निकम सरांनी त्यांचे मनोगत व्यक्त करून मा. व्यवस्थापन मंडळाचे आभार मानले. |
| 194.1 | | बैठकीसाठी ऑनलाईन\ऑफलाईन असलेल्या सर्व मा. सदस्यांचे कुलसचिव तथा सदस्य सचिव यांनी शब्द सुमनांनी स्वागत केले. |

| | | |
|---|---|---|
| 194.2 | 194.2.1 | दिनांक 30 एप्रिल 2024 रोजी झालेल्या 193 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - दिनांक 30 एप्रिल 2024 रोजी झालेल्या 193 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त सदस्य सचिवांनी वाचून दाखविले त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 194.2.2 | दिनांक 2 जुलै 2024 रोजी झालेल्या नियोजन मंडळ सभेचे इतिवृत्तास मंजुरी देणे.<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - दिनांक 2 जुलै 2024 रोजी झालेल्या 45 व्या नियोजन मंडळ बैठकीचे इतिवृत्त सदस्य सचिवांनी वाचून दाखविले त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 194.2.3 | दिनांक 28 मे 2024 रोजी झालेल्या विद्वत परिषद सभेच्या सुधारीत इतिवृत्तास मंजुरी देणे.<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - दिनांक 28 मे 2024 रोजी झालेल्या 63 व्या विद्वत परिषद बैठकीचे सुधारीत इतिवृत्त सदस्य सचिवांनी वाचून दाखविले त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 194.2.4 | दिनांक 4 जुलै 2024 रोजी झालेल्या विद्वत परिषद सभेचे इतिवृत्तास मंजुरी देणे.<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - दिनांक 4 जुलै 2024 रोजी झालेल्या 64 व्या विद्वत परिषद बैठकीचे इतिवृत्त सदस्य सचिवांनी वाचून दाखविले त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 194.2.4 | दिनांक 30 एप्रिल 2024 रोजी झालेल्या 193 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या ठरावांवरील कार्यवाहीचा अहवाल वाचून कायम करणे.<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - दिनांक 4 जुलै 2024 रोजी झालेल्या 64 व्या विद्वत परिषद बैठकीचे इतिवृत्त सदस्य सचिवांनी वाचून दाखविले त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| 194.3 | | **सखोल चर्चेचे विषय** |
| | 194.3.1<br>आस्थापना कक्ष | **विषय -करारावरील पुनर्नियुक्तीबाबतच्यामान्यतेबाबत**...<br>**टिपणी** –डॉ. अर्चना महादेव पंडागळे संजोयक (शैक्षणिक) — वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा यांच्या करारावरील नियुक्तीचा मा. कुलगुरूंच्या अखत्यारीतील कार्यकाळ संपुष्टात आलेला आहे. मा. व्यवस्थापन मंडळाच्या अखत्यारीत त्यांचा कार्यकाळ 1 वर्षापर्यंत वाढविता येतो. पैकी मा. व्यवस्थापन मंडळाच्या 193व्या बैठकीतील ठराव क्र. 193.3.4 नुसार 3 महिन्यांची कार्योत्तर मुदतवाढ देण्यात आली होती. तोही कार्यकाळ संपुष्टात आला आहे. उर्वरित 9 महिन्यांच्या मुदतवाढीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या निर्णयार्थ सादर ...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** — डॉ. अर्चना महादेव पंडागळे संजोयक (शैक्षणिक) — वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा यांचेकडे असलेले पुस्तकांचे काम अपूर्ण आहे. विद्यापीठ परिनियम क्र. 11(2 of 1993) या तरतुदीचा आधार घेऊन व्यवस्थापन मंडळाच्या कार्यकक्षेत असलेल्या अधिकाराने डॉ. अर्चना पंडागळे संयोजक (शैक्षणिक) यांच्या करारावरील नियुक्तीला 9 महिन्यांची मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 194.3.2<br>सेवा सुविधा कक्ष | **विषय - विभागीय केंद्रावरील मनुष्यबळाबाबत .....**<br>**टिपणी** – विद्यापीठाची संपूर्ण महाराष्ट्रात 8 विभागीय केंद्रे आहेत. विभागीय केंद्रांवर दैनंदिन वेतनावरील कुशल/अकुशल मनुष्यबळासंबंधी मागणी वारंवार केली जाते. विभागीय केंद्रावर मनुष्यबळाबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी सेवासुविधा कक्षाकडून मा. कुलगुरुंच्या मान्यतेसाठी टिपणी सादर केली. मा. कुलगुरुंनी यासंबंधी एक समिती स्थापन करण्याविषयी सुचना केली. त्यानुसार समिती स्थापन केली. सदर समितीच्या शिफारशी मा.व्यवस्थापन मंडळाच्या अवलोकनार्थ व निर्णयार्थ सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** — विद्यापीठातील विभागीय केंद्रांकडून कुशल/अकुशल मनुष्यबळासंबंधी मागणी वारंवार केली जाते. विभागीय केंद्रांवरील मनुष्यबळ ह्याविषयी धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. त्यासाठी विभागीय केंद्रनिहाय सद्यस्थितीतील मनुष्यबळाची माहिती मागविण्यात आली होती. मा. कुलगुरुंच्या निर्देशानुसार संचालक विद्यार्थी सेवा विभाग यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली होती. समितीने अहवालात विद्यार्थी संख्येनुसार पदांची वर्गवारी करण्यात आलेला तक्ता सादर केला. तसेच सूचना सुचविल्या. या अहवालावर चर्चा होऊन मनुष्यबळाचा विचार करताना विभागीय केंद्रनिहाय विद्यार्थी संख्या लक्षात घ्यावी हा विचार मांडण्यात आला आणि समितीने सादर केलेल्या अहवालास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | 194.3.3<br>परीक्षा कक्ष | **विषय - गोपनीय प्रिंटरसोबत करार करण्यास मान्यता मिळणेबाबत ......**<br>**टिपणी** – विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांच्या परीक्षा आयोजनासाठी गोपनीय प्रिंटरसोबत दि. 3 मे 2021 ते दि. 2 मे 2024 तीन वर्ष कालावधीकरीता करार करण्यात आला होता. सदर गोपनीय प्रिंटरने यापूर्वी केलेले काम समाधानकारक आहे. त्यामुळे पूर्वीच्याच करारातील दर, अटी व शर्ती कायम ठेवून दि. 3 मे 2024 पासून 1 वर्षासाठी मुदतवाढीचा करार करण्यास परीक्षा मंडळाने ठराव क्र. 49.2.01नुसार मान्यता दिली आहे. सदर ठराव मा.व्यवस्थापन मंडळाच्या अवलोकनार्थ व निर्णयार्थ सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** – परीक्षा मंडळाने घेतलेल्या ठराव क्र. 49.2.01ला मा. व्यवस्थापन मंडळातील सर्व सदस्यांनी कार्योत्तर मान्यता दिली.<br>परीक्षा नियंत्रकांनी यावर्षी मे 2024 मध्ये आयोजित परीक्षांचा अहवाल सादर केला. सर्व परीक्षांचे निकाल 30 दिवसांच्या आत लावले म्हणून परीक्षा नियंत्रक व परीक्षा विभागातील सर्वांचे अभिनंदन करण्यात आले. |
| | 194.3.4<br>परीक्षा कक्ष | **विषय– गायकवाड स्वप्निल मनोहर (का.नों.क्र. 2016017001352885) या विद्यार्थ्याची बी.ए.ची पदवी रद्द करणेबाबत ...**<br>**टिपणी** – या विद्यार्थ्याने विद्यापीठात बी.ए. शिक्षणक्रमासाठी प्रवेश घेऊन पदवी उत्तीर्ण केली आहे. त्याने पुणे विद्यापीठातील नियमित अभ्यासक्रमातील बी.एस्सी.पदवीही त्याच कालावधीत पूर्ण केली आहे. विद्यार्थ्याने त्याची आपल्या विद्यापीठाची पदवी रद्द करणेबाबत अर्ज केला होता. सदर विषय मा. विद्वत परिषदेच्या ठराव क्र.63.3.3 नुसार मंजुरी दिली होती. त्यानुसार परीक्षा मंडळाने सदर विद्यार्थ्याची आपली पदवी रद्द केली आहे. हा निर्णय मा. व्यवस्थापन मंडळाच्या कार्योत्तर मान्यतेसाठी सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** – वरील विषयावर चर्चा करण्यात आली. मा. कुलगुरुंनी याविषयी माहिती दिली. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निकषांनुसार विद्यार्थी एकाचवेळी कोणत्याही विद्यापीठाची दोन पदवी घेऊ शकत नाही. विद्यापीठाने प्राप्त केलेली पदवी रद्द करण्याची तरतुद विद्यापीठ कायद्यात असून विद्यार्थ्याने स्वत: मागणी केली असल्याने विद्यार्थ्यांचा संपूर्ण performance रद्द करण्यात यावा असे ठरले. |
| | 194.3.5<br>परीक्षा कक्ष | **विषय– परीक्षा मंडळावर व्यवस्थापन मंडळाकडून दोन सदस्यांचे नामनिर्देशन करणेबाबत**<br>**टिपणी** – यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ कायदा 1989 (महाराष्ट्र कायदा क्र. XX 1989) मधील कलम 19 ए नुसार – परीक्षा मंडळाच्या कर्तव्य व रचनेसंदर्भात करण्यात आलेल्या परिनियम एस-3 (f) मधील तरतुदीनुसार व्यवस्थापन मंडळाकडून परीक्षा मंडळावर दोन सदस्यांचे 3 वर्षासाठी नामनिर्देशन करण्यात येते. या अनुषंगाने दि. 23-07-2021 रोजीच्या प्रस्तावान्वये व्यवस्थापन मंडळाकडून परीक्षा मंडळावर (1) संचालक, तंत्रिशक्षण, महाराष्ट्र शासन, मुंबई किंवा त्यांचे प्रतिनिधी डॉ. गोरक्ष विठ्ठलराव गर्जे व (2) प्रा. सत्यकाम, प्र-कुलगुरू, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ यांचे 3 वर्षासाठी नामनिर्देशन करण्यात आले होते. सदर सदस्यांची मुदत दि. 22 जुलै 2024 रोजी संपुष्टात येत आहे. कायद्यातील तरतुदीच्या अनुषंगाने व्यवस्थापन मंडळाकडून दोन सदस्यांचे तीन वर्षे कालावधीसाठी नामनिर्देशन करण्याचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सविनय सादर..<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** – व्यवस्थापन मंडळ सदस्य संचालक, तंत्रिशक्षण, महाराष्ट्र शासन, मुंबई किंवा त्यांचे प्रतिनिधी तसेच व्यवस्थापन मंडळावर ज्या संचालकांचे नामनिर्देशन होईल त्यांचे परीक्षा मंडळावर नामनिर्देशित करावे असे सर्वानुमते ठरले. |

| | | |
|---|---|---|
| | 194.3.6<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा | **विषय-प्रा. डॉ. संजीवनी महाले, प्र-संचालक शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांच्या पूर्णवेळ संचालक पदाच्या कार्यभाराबाबचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी सादर** ...<br>**टिपणी** – डॉ. संजीवनी महाले या प्र.संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखेचा प्रभारी संचालकांचा कार्यभार 1 ऑगस्ट 2023 पासून सांभाळत आहेत. डॉ. संजीवनी महाले या सदर कार्यभार स्विकारण्यास तसेच काम करण्यास सक्षम आहेत.<br>विद्यापीठाच्या कायदा 1989 अंतर्गत Section 11 प्रमाणे व विद्यापीठाचे Gazettee मधील Index Part I (A) Second Schedule of the Act मधील Statute No. 3 The Directores नेमणूकीसंदर्भातील तरतुदीनुसार डॉ. संजीवनी महाले यांना पूर्णवेळ संचालक म्हणून मान्यता देण्यासाठी मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर ....<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - डॉ. संजीवनी महाले या 1 ऑगस्ट 2023 पासून शिक्षणशास्त्र विद्याशाखेचा संचालक पदाचा कार्यभार यशस्वीरित्या संभाळत आहेत. विद्यापीठाच्या कायदा 1989 अंतर्गत Section 11 प्रमाणे व विद्यापीठाचे Gazettee मधील Index Part I (A) Second Schedule of the Act मधील Statute No. 3 The Directores च्या तरतूदीनुसार डॉ. संजीवनी महाले यांचे संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा हे पदनाम नियमित करण्यास व त्या पदाचा कार्यभार त्यांच्याकडे सुपूर्द करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 194.3.7<br>आस्थापना कक्ष | **विषय- करारावरील कर्मचाऱ्यांची पुनर्नियुक्तीबाबतचा विषय मान्यतेसाठी सादर**...<br>**टिपणी** –विद्यापीठ परिनियम क्र. 11 (2 of 1993) अन्वये एकूण 3 वर्षे कालावधीसाठी नियुक्ती करण्याची तरुतूद आहे. त्यात मा. कुलगुरूंच्या अखत्यारीत 2 वर्षे व एक वर्ष व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेने नियुक्ती करण्यात येते. सध्या करारावर कार्यरत असलेले डॉ. प्रमोद शंकर पवार, श्री. नेटावणे ऋषिराज दिवाकर, डॉ. शेख शायिन यासिन, श्रीमती रेणुका सुरेश चव्हाण यांचा विद्यापीठ परिनियमानुसार मा. कुलगुरूंच्या अखत्यारीतील 2 वर्षे नियुक्ती कालावधी संपुष्टात आलेली आहे. पुढील 1 वर्षाच्या कालवधीसाठी मा. व्यवस्थापन मंडळाची मान्यता घ्यावी लागेल. मा. कुलगुरूंनी मा. व्यवस्थापन मंडळाच्या वतीने मान्यता दिलेली आहे. मा. व्यवस्थापन मंडळाच्या कार्योत्तर मान्यतेसाठी सादर ...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - विद्यापीठ परिनियम क्र. 11 (2 of 1993) अन्वये एकूण 3 वर्षे कालावधीसाठी नियुक्ती करण्याची तरुतूद आहे. त्यात मा. कुलगुरूंच्या अखत्यारीत 2 वर्षे व एक वर्ष व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेने नियुक्ती करण्यात येते सध्या करारावर कार्यरत असलेले डॉ. प्रमोद शंकर पवार, श्री. नेटावणे ऋषिराज दिवाकर, डॉ. शेख शायिन यासिन, श्रीमती रेणुका सुरेश चव्हाण यांचा विद्यापीठ परिनियमानुसार मा. कुलगुरूंच्या अखत्यारीतील 2 वर्षे नियुक्ती कालावधी संपुष्टात आलेली आहे विद्यापीठास सदर मनुष्यबळाची आवश्यकता असल्याचे तेथील संचालकांनी सुचित केल्याने त्यास मा. कुलगुरू तथा अध्यक्ष मा. व्यवस्थापन मंडळाच्या वतीने मान्यता दिलेली होती. त्यावर साधक बाधक चर्चा होऊन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 194.3.8<br>वित्त विभाग | **विषय- वित्त समिती सभा क्र. 12 दिनांक 12 जून 2024 चे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर**...<br>**टिपणी** –दिनांक 12 जून 2024 रोजी झालेल्या वित्त समितच्या बैठकीत वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करण्यात आली. त्यानुसार वित्त समितीने मंजुरी दिलेल्या विषयांचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळाच्या अवलोकन व मान्यतेसाठी सादर ...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - वित्त समिती सभा क्र. 12 दिनांक 12 जून 2024 च्या इतिवृत्तास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | 194.3.9<br>वित्त विभाग | **विषय- वित्त समिती सभा क्र. 13 दिनांक 15 जुलै 2024 चे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर**...<br>**टिपणी** –दिनांक 15 जुलै 2024 रोजी झालेल्या वित्त समितच्या बैठकीत वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करण्यात आली. त्यानुसार वित्त समितीने मंजुरी दिलेल्या विषयांचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळाच्या अवलोकन व मान्यतेसाठी सादर ...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - वित्त समिती सभा क्र. 13 दिनांक 15 जुलै 2024 चे इतिवृत्तातील तीन विषयांवर सविस्तर चर्चा करण्यासाठी मा. वित्त अधिकारी यांनी व्यवस्थापन मंडळ विषय क्र. 194.4.1 मध्ये वेगळे सादर केले. त्याव्यतिरिक्त उर्वरित वित्त समितीतील ठरावांना खालील प्रमाणे दुरूस्तीसह मान्यता देण्यात आली. त्या चर्चेदरम्यान सन्माननीय सदस्य डॉ. अनिल कुलकर्णी यांनी नव्याने भरलेल्या 53 करारावरील शैक्षणिक संयोजक (सहायक प्राध्यापक लेव्हल) यांनी मागील 6 महिन्यात केलेल्या कामाचे पुनरावलोकन करण्यात यावे. त्यानंतर त्यांना मुदतवाढ देण्यात यावी, अशी सूचना मांडली त्यास मा. अध्यक्ष तथा कुलगुरू यांनी विद्यापीठ त्याच पद्धतीने काम करणार होते असे सांगितले व त्यांची सूचना मान्य केली.<br>1. मा. कुलगुरू कार्यालय, मा. प्र. कुलगुरू कार्यालय, मा. कुलसचिव कार्यालय व सेवा सुविधा प्रमुख येथे विद्यापीठातून सेवानिवृत्त झालेल्या व करारावर नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांना अतिरिक्त भत्ता अदा करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली पण वरील विभागात कार्यरत सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांना (पे मायनस पेन्शन नुसार) **PAY-PENSION** नुसार नियुक्ती आदेश देण्यात आली असेल त्यांना अतिरिक्त भत्ता देण्यात येवू नये असे सर्वानुमते ठरले. |
| 194.4 | | **मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय** |
| | 194.4.1<br>वित्त विभाग | दि. 15 जुलै 2024 च्या वित्त समितीमध्ये पारित झालेले विषय येणाऱ्या व्यवस्थापन मंडळासमोर सविस्तर चर्चेसाठी सादर..<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - वित्त समिती सभा क्र. 13 मधील खालील तीन विषयांवर पुन्हा सविस्तर चर्चा करून मा. व्यवस्थापन मंडळाने मान्यता दिली<br>1. प्राध्यापक राम ठाकर यांच्या पत्नी संजीवनी राम ठाकर आणि मुलगी कु. विशाखा राम ठाकर यांचे वैद्यकीय देयक रु. 8,02,764/- इतके शासन निर्णयानुसार अदा करण्यास मान्यता देण्यात आली.<br>2. विद्यापीठाचे सन 2023-24 चे अंकेक्षण/लेखा परीक्षण करण्यासाठी वित्त विभागामार्फत नेमलेल्या समितीने केलेल्या शिफारशीस वित्त समितीने मान्यता दिलेली आहे. त्यावर चर्चा करून मे. ए. एस. बेदमुथा, नाशिक यांना विद्यापीठाचे सन 2023-24 चे अंकेक्षण/लेखा परीक्षण करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>3. विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना **Automated Permanent Academic Account Registry (APAAR)** चे **Smart Card (YESHCARD)** देण्याबाबत नियोजन बैठकीत झालेल्या सादरीकरण करण्यात आले . वित्त समितीत झालेल्या साधक बाधक चर्चेनुसार या स्मार्ट कार्डमुळे विद्यार्थ्यांना परीक्षेचे परीक्षा प्रवेशपत्र, गुणपत्रक, ओळखपत्र **इत्यादी बाबींसाठी** विद्यापीठ परीक्षा केंद्राना याकरिता खर्च द्यावा लागणार नसल्याने विद्यापीठाच्या दृष्टीने फायदेशीर असल्याने **Automated Permanent Academic Account Registry (APAAR)** चे **Smart Card (YESHCARD)** हे कार्ड देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| 194.4.2 | वित्त विभाग | **नियुक्तीमधील अनियमितता शिथील करण्यासंदर्भात समितीने खालील कर्मचाऱ्यांच्या केलेल्या शिफारशीस मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** – विद्यापीठातील 68 कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्यांमधील वयोधिक्य, नियुक्तीची कार्यपद्धती तसेच शैक्षणिक पात्रता या बाबींमध्ये अनियमितता दर्शविलेल्या प्रकरणांपैकी खालील 5 कर्मचाऱ्यांबाबत समितीने केलेल्या शिफारशी व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर<br>१. श्री. अभय मनोहर कुलकर्णी<br>२. श्री. प्रदीपकुमार दामोदर पवार<br>३. श्री. राजेंद्र भागवत तळेले<br>४. श्री. राजाराम पांडुरंग बचाटे<br>५. श्री. अविनाश उमाकांत भरणे<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** – श्री. अभय मनोहर कुलकर्णी, श्री. प्रदीपकुमार दामोदर पवार, श्री. राजेंद्र भागवत तळेले, श्री. राजाराम पांडुरंग बचाटे, श्री. अविनाश उमाकांत भरणे यांच्या नियुक्तीमधील अनियमितता शिथील करण्यासंदर्भात समितीने केलेल्या शिफारशीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| 194.4.3 | सेवा सुविधा कक्ष | **विद्यापीठाकरिता वाहन खरेदी करणेबाबत.**<br>**टिपणी:** प्रस्तुत विद्यापीठात हॅब्रिड (इलेक्ट्रीक प्लस पेट्रोल) प्रकारातील इनोव्हा घेण्यात यावी. कारण विद्यापीठात वेळोवेळी उच्चपदस्थ मंत्रालयीनअधिकारी भेट देतअसतात. त्यांना ने-आण करणे तसेच विद्यापीठातील इतर दोनव्ही इनोव्हा वाहने जुनी झालेली आहेत. ती अधुन मधून बंद पडतात. त्यासाठी विद्यापीठात एक हॅब्रिड प्रकारातील (इलेक्ट्रीक प्लस पेट्रोल) एक इनोव्हा व कॅम्पस वर साहित्य वाहतुकीकरिता एक पिकअप वाहन खरेदी करण्याच्या निर्णयास्तव सादर.<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** : उपरोक्तप्रमाणे विद्यापीठात हॅब्रिड (इलेक्ट्रीक प्लस पेट्रोल) प्रकारातील इनोव्हा घेण्यात यावी. कारण विद्यापीठात वेळोवेळी उच्च पदस्थ मंत्रालयीन अधिकारी भेट देत असतात. त्यांना ने-आण करणे तसेच विद्यापीठातील इतर दोन व्ही इनोव्हा वाहने जुनी झालेली असून ती अधुन मधून बंद पडतात. त्यामुळे वरील प्रमाणे दोन वाहने कंपनीच्या अधिकृत डिलर कडून दरपत्रके मागवून खरेदी करण्यास व येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात आली. |
| 194.4.4 | वित्त विभाग | **विद्यापीठाच्या शैक्षणिक विस्ताराकरिता महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात विद्यापीठाच्या शैक्षणिक संकुले उभारणीबाबत.**<br>**टिपणी** : महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील दुरस्थ शिक्षणक्रमासाठीची मागणी मोठ्या प्रमाणात होत असल्याकारणाने व विद्यापीठाचे विभागीय केंद्रावर विविध जिल्ह्यातील वाढत्या शैक्षणिक सुविधांच्या मागणीचा ताण पडतआहे. सदर कामाचा ताण कमी करण्याकरिता तालुका पातळीवर व जिल्हा पातळीवर विद्यापीठाचे केंद्र सुरु करून महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या दुरस्थ शिक्षणाची व्यवस्था विद्यापीठाने करणे आवश्य आहे. त्यामुळे मागणी असेल त्या ठिकाणी अशी केंद्रे स्थापन करणे आवश्यक वाटते. याबाबत सविस्तर विचार विनिमय होऊन निर्णयास्तव सादर.<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** : महाराष्ट्रात मुळ शिक्षणाच्या प्रवाहात नसलेल्या विद्यार्थ्याकरिता व ज्या विद्यार्थ्यांना अधिकचे कौशल्य संपादन करावयाच्या अशा विद्यार्थ्यांची शैक्षणिक गरज दुरस्थ माध्यमातून पुर्ण करणे हे या विद्यापीठाचे कर्तव्यच आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील मोठी तालुके, व जिल्ह्याच्या ठिकाणी विद्यापीठाने त्या-त्या विभागीय केंद्राच्या अंतर्गत स्वतंत्र केंद्र स्थापन करण्याची मागणी केल्यास त्या ठिकाणी जमीनीचे संपादन करून केंद्राकरिता आवश्यक ती इमारत व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरले. सध्या बारामती व रत्नागिरी येथील इमारतीचे काम अंतिम टप्प्यात आहेत. तसेच लातुर येथील विद्यापीठाच्या ताब्यात |

| | | |
|---|---|---|
| | | असलेल्या इमारतीत शैक्षणिक सुविधा उपलब्ध करण्याचे ठरले. उस्मानाबाद, अमळनेर आणि ठाणे इत्यादी ठिकाणच्या संपादित असलेल्या जमीनीवर विद्यापीठाचे स्वतंत्र शैक्षणिक संकुले उभारण्याचे कार्यहाती घेण्याचे ठरले. विद्यापीठाच्या प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र मुक्त महाविद्यालय स्थापन करण्याकरिता आवश्यक असणाऱ्या बाबी विद्यापीठाने त्वरित पार पाडाव्यात व महाविद्यालय सुरु होण्याच्या दृष्टीने पुढील कार्यवाही त्वरित करावी असेही ठरले. उपरोक्त प्रमाणे याबाबत आवश्यक असणाऱ्या शासन मान्यता, प्रशासकीय मान्यता, विद्यापीठस्तरीय शैक्षणिक व वित्तीय मान्यता घेण्याची कार्यवाही करण्याबाबत सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. |

**मा. कुलगुरु, अध्यक्ष यांच्या मान्यतेने श्री. दिलीप भरड, सचिव यांनी सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानले व सभा समाप्त झाली.**

**सचिव तथा कुलसचिव**
**व्यवस्थापन मंडळ**

**अध्यक्ष तथा मा. कुलगुरू**
**व्यवस्थापन मंडळ**